प्रकरण ३ रे

# "नीहार" : आशय व अभिव्यक्ती विचार

पद्मा गोळे यांच्या "नीहार" व "आकाशवेडी" या काव्यसंग्रहाचा आपणास अभ्यास करावयाचा आहे. "नीहार" या काव्यसंग्रहाची पहिली आवृत्ती इ.स.१९५४ साली व दुसरी आवृत्ती इ.स. १९५५ साली प्रसिद्ध झाली. "नीहार" या कवितासंग्रहात एकूण ५८ कविता आहेत. या काव्यसंग्रहातील कवितांमध्ये १) प्रेमभावाची विविधता, २) वात्सल्य, ३) भगिनी प्रेम, ४) सखी प्रेम, ५) काव्यनिर्मितीची कैफियत ६) आत्माविष्काराची ओढ ७) निसर्गाची ओढ ही आशयसूत्रे आहेत.

प्रेमभावाची विविधता हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत. "नाही जायचे असाने"(पृ.३), "अनुभविसी का कधी (पृ.४) "नको विचारू अर्थ"(पृ५.), रहदारीच्या पथापलीकडे (पृ.६), "याच कांही क्षणासाठी (पृ.८), "विडा" (पृ.९), "अजून कांही आहे बाकी" (पृ११), "ये अवचित नवजीवन" (पृ.१२), "संध्याकाळ उलटली" (पृ.१५), "रे, तू फसवा" (पृ.१६), "शेजारी" (पृ.१९), "नकळत(पृ.२१, २२), "माहेरास जावयाचे" (पृ.२२), "कधी कधी"(पृ.२३), "पुन: प्रत्यय" (पृ.२७), "होते मी जगत" मुद्दे"(पृ.२८), "लक्ष्मणरेखा(पृ.२५), "वैरी" (पृ.२९), "अशीच याची रात्र पाहुणी" (पृ.२९, ३०), " अंधाराच्या संपुटी" (पृ.३२), "उगवला शुक्र" (पृ.३३, ३४), "झपाटलेले झाड"(पृ.३८, ३९) "मी घुसळण घुसळीत असता" (पृ.४२), "ही हिरवी हिरवी राई" (पृ.४३), "या रस्त्यातच"(पृ.४४), "तू नव्हेस तो" (पृ.४४), "येती वसंत पाउली"(पृ.४५)

"अचानक उजळीत",(पृ.४६), "अखेर येते" (पृ.४९), "करवंदांची ओंजळ", (पृ.५१) "विरहिणी" (पृ.५२), "त्या तसल्या सायंकाळी (पृ.५४), "अजून नाही" (पृ.५५), "आषाढ" (पृ.५६,५७), "प्रेम नको वाटाया" (पृ.५७)," हे शापित वंचित मन"(पृ.५८), " अभिलाषेच्या पोटी", (पृ.५९)

प्रेमभावाची चिकित्सा हे आशयसूत्र विरहभाव, प्रियकराचे कौतुक, सांस्कृतिक संकेत, मूक प्रेम, सूचक प्रीती, अलौकिक प्रीती, दैवी प्रेम, सुखदु:खमिश्रीत प्रेम, परंपरेची ओढ, उत्कट प्रेमभाव, विफल प्रीती, प्रेमाचा प्रभाव, परस्परांना विद्ध करण्याची वृत्ती, स्वप्नमयता, माहेरची ओढ, निसर्गाशी संवाद साधणारे प्रेम, भारतीय प्रीती, संयमित प्रेम, दु:ख साजरे करण्याची वृत्ती, प्रेमाचे अस्फुट दर्शन, समर्पणशील वृत्ती, तृप्त प्रेम, विरहभावाचे चित्रण, फसल्याची जाणीव, अस्वस्थ प्रीती, ~~द्वंद्वात्मक~~ भाव, दु:खी प्रेम, स्मरणोत्सव, प्रेमाचा द्वंद्वा/द्वंद्व आठव, आदर्श प्रीती, निर्व्याज प्रेम, आठवणींचा उत्सव, प्रियकराची ओढ, चिरंतन प्रेम व राधाकृष्ण प्रेम या अंगाने स्पष्ट झाले आहे.

## विरहभाव :-

"नाही जायचे असाने" या कवितेमध्ये विरहाच्या कल्पनेने नायिकेच्या मनात निर्माण झालेली हुरहुर कवयित्रीने सूचकतेने व्यक्त केली आहे. कवितेचा नायक परगावी निघालेला आहे. त्यामुळे तिचे मन बावरले आहे. परगावी जाण्यासाठी लागणाऱ्या वस्तू ती आपल्या हाताने आवरते. परंतु मन मात्र आवरता येत नाही. ते सहवाससुखाचा पसारा मांडत आहे. वस्तू आवरताना नायकाचा कंगवा हाती आल्यावर ती आपल्या केसातून

फिरवते. नुसत्या स्पर्शाने तिचे मन थरारते. पेटीत कपडे ठेवीत असताना तिला शर्टवर कपाळ टेकण्याची इच्छा होते. परंतु शर्टवर कुंकवाची खूण उमटेल व मित्र आपल्या पतीला बोलतील असे तिला वाटते. पुस्तकामध्ये ती मन रमविण्याचा प्रयत्न करते; पण मनातील हुरहुर कमी होण्यासाठी ती दोघांचे छायाचित्र पाहते. त्याचवेळी तिचा पती तिच्याकडे हसत रोखल्या दृष्टीने पाहतो, तेव्हा ती आपल्या पतीस म्हणते की, असे रोखल्या दृष्टीने पाहू नकोस. त्यामुळे तुला जावेसे वाटणार नाही.

प्रियकराचे कौतुक
=============

प्रियकराचे कौतुक हा भाव "रहदारीच्या पथापलिकडे"(पृ.६) या कवितेत व्यक्त झालेला आहे. प्रियकर गर्विष्ठ आहे. त्यामुळे त्याचे घरही छाती काढून पुढे बसलेल्या शुभ्र कबुतरासारखे आहे. या घराचा उंच मनोरा आणि विजेचे निळे डोळे आकाशाशी हितगुज करत आहेत. त्याच या चांदणीशी कुजबूज करीत आहेत. त्या बंगल्या सभोवताली जी बाग आहे तिथे लाल, कुसुंबी, भडक फुलांची वेल वाढते आहे आणि सुवर्णचंपक तिला खुणावतो आहे. प्रियकर काश्मीरी शाल लपेटून गच्चीवर उभा आहे. त्याच्या हातातला उंची चिरूट त्याचा रूबाब वाढवतो आहे. या रहदारीच्या रस्त्यावरून जाताना या नायिकेला दु:ख होते; पण त्याचवेळी प्रेमाचा गुलाब तिच्या हृदयात दरवळत असतो. थोडक्यात ही प्रीती आपल्या प्रियकराचे कौतुक करता करता आपल्या प्रीतीचेच कौतुक करत आहे.

सांस्कृतिक संकेत :
=============

विडा रंगणे म्हणजे पती पत्नींचे एकमेकांवर प्रेम असणे असा एक संकेत आपल्या संस्कृतीत आहे. विडयाच्या रंगण्यात आपली प्रेमभावना

कवयित्रीने व्यक्त केली आहे. ती "विडा" कवितेत नायिकेचा पती सध्या तिच्याजवळ नाही; परंतु विडा खाल्यानंतर तिला पतीची आठवण येते. बारा वर्षापूर्वी जेव्हा तिचे लग्न नुकतेच झाले होते, तेव्हा तिच्या पतीने विडा खाल्याने त्याचे ओठ रंगले होते. त्यावेळी तो भावूक नजरेने तिच्याकडे पाहात होता. त्याच्या नजरेतील भाव ओळखून नायिकेने तेथून पळ काढला. तिच्या पाठोपाठ तोही धावला. त्याच वेळी दारात तिची सासू उभी होती. त्यांची धांदल उडते व तो सत्य लपविण्याचा असफल प्रयत्न करतो. या साऱ्याचे तिला हसू येते.

"चार डोळ्यांच्या मीलनी
राया, रंगला रे विडा" (पृ.९)

असा प्रत्यय येतो. ही आठवण केवड्याच्या दरवळाप्रमाणे आजही आठवणींचा सुगंध उधळत आहे.

## मूक प्रेम :

शब्दाने प्रेम व्यक्त होते. परंतु मूकपणेही प्रेम व्यक्त होते. "याच कांही क्षणासाठी" या कवितेत न बोलता व्यक्त होणाऱ्या प्रेमाच्या क्षणासाठी कवयित्रीचे मन आतुर झालेले दिसते. सुरुवातीला कवयित्रीने आपल्या घराचे वर्णन केले आहे. फिकट हिरव्या भिंती, झुलणारे पडदे, कोचांच्या हिरव्या गर्द गिरद्या. हे सर्व वर्णन उच्चभ्रूंच्या जीवनाचे दर्शन घडविणारे आहे. त्या वर्णनामध्ये चित्रस्पर्शित्व आहे. त्या त्या प्रसंगाचे चित्र नजरेसमोर उभे राहते. वाचनामध्ये जेव्हां कांही विशेष सुंदर असे येते तेव्हा कवयित्री व तिचा पती एकमेकांना सांगतात. त्यावेळी त्यांना आगळा आनंद होतो. तर कधी कधी दोघेही जण खिडकीजवळ जाऊन

आकाशीचे तारांगण न्याहाळतात. शांत अशा वातावरणात सहवास-सुखाचे क्षण हे लाख प्रेमबोलापेक्षा कवयित्रीस श्रेष्ठ वाटतात. व याच क्षणासाठी तिचे चित्त आतुरते.

सूचक प्रीती :

सूचक प्रीतीचे दर्शन "शेजारी" (पृ.१९) या कवितेत घडते. काळाच्या ओघात नायक नायिकेच्या शेजारी असतो. त्याच्या दारी प्राजक्ताचे झाड असते; पण फुलांचा सडा मात्र नायिकेच्या दारी पडतो. बघता बघता प्राजक्ताचा सुगंध त्या दोघांच्या प्रेमाचा सुगंध बनतो. ही भावना एवढी उच्चतम होती आणि वासनेचा तिला स्पर्श नसल्याने तिची माधुरी वृध्दिंगत होत गेली. नायक नायिका दूर झाले; पण ही भावना त्यांना अमृतासमान वाटली. संजीवक वाटली. सूचक प्रेम असे उत्कट रूप घेऊन येथे प्रकट होते.

"अलौकिक प्रीती"

"नको विचारू अर्थ" या कवितेत कवयित्री अलौकिक अशा प्रेमाच्या शोधात असल्याचे दिसते. तिची नजर उगाच दूर खिळते व ऊर भरून येतो. कधी कधी एखाद्या सायंकाळी मनाची अवस्था बदलते व डोळ्यांमध्ये स्वप्नप्राप्तीची तृप्ती आढळते. कधी कधी हळव्या सूरात सूर मिसळविते तर कधी कधी मनाची तडफड होते. मनामध्ये काहूर माजते. डोळ्यांत अश्रू येतात. उसासे सोडले जातात. पण घेतलेला ध्यास सुटत नाही. कधी कधी सुखस्वप्न पाहण्याने हुरहुर निर्माण होते.

"दैवी प्रेम"

"ये अवचित नवजीवन" या कवितेत अभिलाषारहित प्रीती व

मीलनाची ओढ व्यक्त केली आहे. मनामध्ये प्रीती ही पुष्पसुगंधासमान गीत गात येते आहे. कवयित्रीला चिरकाल सुंदर असणारे नवजीवन हवे आहे. रोमारोमातून तसेच धमन्यांतून जसे मंजुळ पैंजण वाजते, तसे नवजीवन तिला हवे आहे. चैतन्यमयी व आवेशपूर्ण उसळणारे अमृत म्हणजे यौवन आहे. मंद असा प्रकाश देणाऱ्या चंद्राप्रमाणे शीतल असे नवजीवन कवयित्रीला हवे आहे.

सुखदु:खमिश्रित प्रेम :-

"असेच यावी रात्र चांदणी" या कवितेत कवयित्री आपल्या मनातील सुखदु:खयुक्त भावना व्यक्त करते. मनाला सुखविणारी रात्र व दुखविणारी रात्र असावी. त्या रात्री पाठीमागच्या जखमा ताज्या करणारा क्षण असावा. तसेच तू त्या जखमांवर फुंकर घालावीस अशा या साऱ्या सुखदु:खाच्या भावनांमध्ये मिळणारे दु:खसुद्धा मधुर वाटते. अशा प्रकारे या कवितेत कवयित्रीने प्रेमामध्ये सुखाबरोबर दु:खाचीही मागणी केलेली आहे. अशा चांदण्या रात्रीचे स्वप्न कवयित्रीने पाहिले आहे.

परंपरेची ओढ :-

अलौकिकाच्या रूपात आपल्या प्रियकराला पाहणारी नायिका " मी धुळवड धुतळीत असता" या कवितेत येते. धुळवड धुळीत असता तिला गोकुळाची आठवण येते. ती कृष्णाच्या रूपात तर कधी रामाच्या रूपात आपल्या प्रियकराला पाहते. तर कधी ती चंद्रसेना होते. शेवटी कवयित्री म्हणते,

> "उघडता मी मालिश आता
> देहातील रूप कोणाचे ?" (पृ.४२)

शेवटी ती अलौकिकाकडून लौकिकाकडे येते.

उत्कट प्रेमभाव :-

"अधरांच्या संपुटी" ही कविता उत्कट प्रेमभाव व्यक्त करणारी आहे. प्रेमभावना ही क्षणकाल उत्कट रूप धारण करते. पण ती प्रकट होण्यास नकार देते. हा भाव मोत्याप्रमाणे अमोल असतो. एक क्षणभरच तो अधरावर नाचतो. अधर थरथरतात. तो भाव प्रकट होण्यास विलक्षण आतुर झालेला असतो; पण मन त्यास परवानगी देत नाही आणि तो हिरमुसला होऊन मनाच्या दालनात येण्यासाठी मागे फिरतो. हा प्रेमभाव जसा अधरांवर नाचतो तसा कोमल डोळ्यांमध्ये क्षणकाल चमकतो. आता त्याला पूर्ण आकार येईल असे वाटते; पण मनाच्या हुकूमाने व्याकूळ होऊन तो माघपरत फिरतो. तर अशी हा प्रेमभाव हृदयाच्या हृदयात क्षणकाल उमलतो. क्षणकालच सुगंध देतो. आणखी काही काळ हा सुगंध दरवळत राहील असे वाटते;पण तसे घडत नाही. हा प्रेमभाव म्हणजे कवयित्रीच्या मनाचे हितगुज आहे. ते हितगुज क्षणभरच जगते. क्षणभरच सुगंध देते व दुसऱ्या क्षणी मरते. ही त्याला कायमची सजा आहे. उत्कट प्रेम असेच असते. इहलोकात ते अवतरावे असे वाटते;पण अवतरत नाही. हा दु:खपूर्ण भाव या कवितेतून उत्कटपणे प्रकट झाला आहे.

"झपाटलेले झाड" ही कविता प्रेमातील उत्कटता स्पष्ट करणारी आहे. हे प्रेम पतंगाप्रमाणे आहे. दीपज्योतीवर झडप घातली तर आपला नाश अटळ आहे. ते त्या पतंगाला माहित असते; तरी पण तो उत्कटपणे झपाटल्यासारखा ज्योतीवर झेप घेतो. एक क्षणभर प्रेमाचा आनंद त्यास मिळतो;पण लगेचच त्याला मृत्यूला सामोरे जावे लागते.

गोविंदाग्रजांच्या "प्रेम आणि मरण" या कवितेचे अनुकरण येथे कवयित्रीने केलेले आहे. तेथे वीज झाडावर कोसळते तर इथे झाडाला जाई या वेलीचा विळखा बसतो. एवढाच फरक आहे पण गोविंदाग्रजांच्या कवितेचे हे अनुकरण आहे असे वाटते.

विफल प्रीतीचा भाव व्यक्त करणारी "प्रेम नको वाटाया" ही कविता आहे. माझे प्रेम वाटले तर आपणाला जणू जन्मठेव झाली असे नायकाच्या मनात येईल म्हणून नायिका दूर होते. फक्त नायकाने जाता जाता नायिका प्रिय होती एवढेच सांगावे म्हणजे त्या वेदनेवर तेवढीच फुंकर असे नायिकेस वाटते.

प्रेमाचा प्रभाव :
============

प्रेमाचा प्रभाव "होते मी जगत मुदे"(पृ.२८) या कवितेत परिणामकारकपणे व्यक्त झालेला आहे. शांत, कृष्ण अंधारात मी आनंदाने जगत होते. माझे जीवन आणि मरण अंधारातच होते. या अंधाराच्या रंगाशिवाय दुसरा कोणताही रंग मला माहिती नव्हता पण या अंधारात एक नाटय घडले; क्षणकाल वीज लखलखली, कणाकणाने अंधार उजळला आणि जीवन म्हणजे जणू इंद्रधनुष्य आहे. त्याचा रंग रंग जीवंत झाला/जि आहे असा अनुभव आला; पण ही वीज क्षणभरच लखलखली आणि अंधारात ती नाहीशी झाली पण हृदयामध्ये रंगाचे वेड उरले. पूर्वीच्या अंधारात शांती होती. ती शांती आता उरली नाही. प्रेमाचा प्रभाव एवढा की जीवनाची गतीच बदलून गेली.

परस्परांना विध्द करण्याची वृत्ती
========================

"अजून कांही आहे बाकी" या कवितेत नायक व नायिका या दोघांमध्ये भांडण झाले आहे. परंतु अजूनही दोघांच्या मनात एकमेकांबद्दल प्रेम आहे. त्याचबरोबर एकमेकांवर रागही आहे. रस्त्यावर, नदी किनारी अवचितपणे जर नजरानजर झाली तर पुन: तिरक्या नजरेने पाहिले जाते. उपचाराचे म्हणून चार शब्द बोलतानाही त्यामध्ये आत्मीयतेचे अमृत टपकते. दोघेही एकमेकांची उपेक्षा करतात. पण मनात आपणाला प्रतिसाद मिळावा ही अपेक्षा आहे. त्यातूनच ते परस्परांना विद्ध करणारे शब्द वापरुन / घ जखमी करतात.

स्वप्नमयता :
=============

आपल्या प्रियकराच्या येण्याचे स्वप्न "संध्याकाळ उलटली" या कवितेची नायिका पाहते. संध्याकाळ उलटली आहे. अंधार पडू लागलेला आहे. झाडे स्तब्धपणे आपल्या पोटी पक्षिबाळे धरुन उभी आहेत. कुठेतरी देवळात सांज आरती चालली आहे. ही सांजआरती कातरवेळी मनाला हुरहुर लावते. अशा वेळी भिंतीवर कुणाची तरी सावली पडल्याचा भास होतो. उभे राहण्याची ऐट, धारदार नाक, केसांचे वळण, सुटाबुटाचा झोक हे सारे तिच्या नजरेसमोर उभे राहते. अशा कातरवेळी पाल चुकचुकते. व मनामध्ये काहूर माजते. सांजवात लावून ती अधीरतेने आपल्या प्रियकराची येण्याची वाट बघते.

स्वप्नमय प्रेम हे "उगवला शुक्र" या कवितेत व्यक्त झाले आहे. या कवितेची नायिका ही स्वप्नाळू वृत्तीची आहे. स्वप्नामध्ये तिचा प्रियकर येण्याचे वचन देतो म्हणून ती पहाटेच्या वेळी अधीर होऊन आपल्या प्रियकराची वाट पाहते. हिरवळीवर कुणाचे पाऊल तर वाजले नाही ना ? असे तिला वाटते

तो कोणत्याही क्षणी येईल व लोहाचे सोने होईल असे तिला वाटते. गवाक्षातून पहाण्याचीही इच्छा होते; पण निराशा होईल म्हणून ती पाहणे टाळते. तो वाट कशी विसरला, कां मी शेल्याला गाठ दिली नव्हती. "येईन" असे स्वप्नात त्याने वचन दिले होते. म्हणून मी जीवनाचे स्वप्न रंगविले होते. तो आल्यावर त्याच्या पायी सर्वस्व अर्पण करेन. असे मी योजिले होते. पण तसे घडले नाही. शुक्र उगवला. पहाट झाली तो येण्याची आशा मावळली. पण नायिका आशावादी आहे. भविष्य-काळात तो जरूर येईल असे तिला वाटते. तोवर त्याची वाट पाहण्याची तिची तयारी आहे. हे स्वप्नमय प्रेम आशावादाने रंगलेले आहे.

माहेरची ओढ :

स्त्रीला आपल्या माहेरचे कौतुक असते. तिला असणारी ओढ "माहेरास जावयाचे" या कवितेतून दिसून येते. कवयित्रीला माहेरास जावयाचे वेध लागले आहेत. माहेरास जाताना तिच्या मनात जुन्या-नव्या आठवणी येत आहेत. गर्द हिरवा चुडा घालून ती माहेरास पहिल्यांदा गेल्याचे तिला आठवते. त्याच बरोबर जाईजुईच्या संगतीची पहिली वहिली रात्रही तिला आठवते. त्याचबरोबर सकाळी नणंदा-जावांची मस्करीसुद्धा आठवते. गाडी सुटताना नव-याने हात दाबल्या-मुळे सा-या अंगभर झिणझिणी आणणारी गोड कळही तिला आठवते. आता जरा पोक्तपणा हवा असे ती पतीला म्हणते. भाचीच्या लग्नाला ती चालली आहे. पण आठ दिवसात परत येण्याचे वचन ती देते. प्रकृतीस जपण्यास सांगते. कारण पावसापाण्याचे दिवस आहेत.

माहेरची ओढ तिला आहेच; पण पतीचा विरह होणार या भावनेने तिच्या डोळ्यांत पाणी येते,तेव्हा ती डोळ्यांत कोळशाचे कण गेल्याचे सांगते. स्त्रीसुलभ माहेरची ओढ;पण सासरची व पतीची तेवढीच ओढ या कवितेच्या नायिकेस आहे. ती समंजस आहे म्हणूनच पोक्तपणा हवा किंवा प्रकृतीस जपा असे सांगते.

निसर्गाशी संवाद साधणारे प्रेम :

"येसी वसंत वाळली" या कवितेत निसर्गाशी संवाद साधणारे प्रेम व त्यातील सुखद:खाच्या क्षणांचे वर्णन आहे. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या परिपक्वतेचेही दर्शन इथे घडते. तू वसंताप्रमाणे येतोस. वसंतामध्ये ज्याप्रमाणे कळ्या फुलतात त्याप्रमाणेच मी सुद्धा तुझ्या येण्याने आनंदीत होते. ग्रीष्मामध्ये मात्र पानगळ चालते. कळ्या गळतात. असेच तुझ्याकडूनही घडते. वर्षा ऋतूत पवित्र स्नान घडते तसा प्रेमाचा पाऊसही मला चिंब करतो. शरदाचे चांदणे जसे धुंद करते तसे तुझे प्रेम मला धुंद करते. कधी तू शिशिराप्रमाणे वृक्षाच्या तरुणी पाने गाळतोस. पुन: नव्याने बाग फुलवणारा तू माळी बनतोस. परंतु मला माळीण बनता येत नाही. तू केलेली मोडतोड आता तशीच राहू दे. भलतीच तडजोड आता करणे शक्य नाही.

भारतीय प्रीती

"कधी-कधी" या कवितेत कवयित्री जुन्या नायिकांच्या माध्यमातून आपली प्रेमभावना व्यक्त करते. कधी कधी उर्वशी प्रमाणे आपल्या शृंगाराने तुला भुलवावे. उर्वशीने ज्याप्रमाणे शंकराचे तप भंग

केले त्याचप्रमाणे तुला भावमोहातून बाहेर काढावे असे तिला वाटते. तर कधी राधा बनून तुझ्या बासरीने वेडे व्हावे असे वाटते. रुक्मिणी होऊन तुझ्या हाती पत्र देऊन तुला प्रेमाचे आवाहन करावे असे तिला वाटते, तर केव्हा सती होऊन यज्ञात उडी टाकून उमेप्रमाणे तुला वर मानावे तर कधी सावित्रीप्रमाणे तुझ्यासाठी हसत हसत काळाशी लढावे असे वाटते. वेळ पडली तर

"भूमिगता सीताच होऊन
एकाकीपणी तुज रडवावे" (पृ.२३)

असे वाटते. कवितेची नायिका ही अलौकिकाच्या रूपात आपल्या प्रियकरास पाहाते. व उदात्त व अलौकिक प्रेम ती करते.

संयमित प्रेम :-

"या रस्त्यातच" या कवितेत कवयित्रीने संयमित प्रेमाचे वर्णन केले आहे. रस्त्यातच उभ्या उभ्या नायक काहीतरी बोलतो. ती ऐकत नाही. परंतु रस्त्याचे भानही राहात नाही कारण तो निघून जातो व ती रस्त्यातच घुटमळते. तो जाता जाता वळून पाहतो. दोघांच्या नजरा परस्परांमध्ये मिळतात. आजही त्या आठवणीने तिच्या मनामध्ये भावनिक आवर्त उभे राहते. ती म्हणते, "

" तो रस्ता, ते घुटमळणे, ती दृष्टीभेट,
ते बोल, स्मरता जाता
अजूनही केव्हा
सभ्य मनाचा तोल" (पृ. ४४)

आपल्या भावनांना आवर घालणारी संयमित व सभ्य अशी कवितेची नायिका आहे.

## दु:ख साजरे करण्याची वृत्ती :

"ही हिरवी हिरवी राई" या कवितेची नायिका आपल्या प्रियकराच्या आठवणीने व्यथित झाली आहे. त्याच्या आठवणीसाठी तिला एकांत हवासा वाटतो. त्याच्या आठवणीने तिचा एकांत रंगतो. हृदयातील दु:खे स्मृतींचे नंदनवन बनतात. एकांताला स्मृतींची गाणी गायला शंभर तोंडे फुटतात. एकांताच्या शांती मधूनच स्मरणाची अमृतवाणी पाझरते. कधी शांतीचा कोंब भंग पावतो व स्मृतीचा कल्लोळ उठतो. तेव्हा तुझ्या अनंत प्रतिमांनी माझा एकांत रंगतो. हृदयामधली सारी दु:खे हसरी बनतात आणि दु:खाची तीव्रता कमी होते. दु:ख हसून साजरे करण्याची वृत्ती प्रगट होते.

## प्रेमाचे अस्फुट दर्शन :

"अखेर येते" (पृ.४९) ही एक विफल प्रीतीची कविता आहे पण हा भाव या कवितेत स्पष्टपणे व्यक्त होत नाही असे वाटते.

नायिका आपले जखमी हृदय घेऊन नायकाच्या मंदिरी येते. आपल्या रक्ताने दिवसरात्र ती नायकास आळविते. तो कसा कोठून नकळत येतो आणि नायिकेस प्रेम दृष्टीने न्याहाळतो व त्या रक्ताची क्षणात लाल सुगंधी गुलाबसुमने होतात. त्याच्या सुवासाने नायिका धुंद होते. येथपर्यंत प्रेमभावनेचा स्वाभाविक विकास झाल्यासारखा वाटतो, पण परत नायिका दारोदार सुख का हुडकते ? आपल्या हृदयावर नवी जखम का घेते हे कळत नाही. म्हणजे रक्ताची गुलाब सुमने होणे या भावाला छेद जातो. हा दोष जाणवतो.

विफल प्रीतीचे दर्शन घडविणारी "अजून नाही" (पृ.५५) ही कविता आहे. या पृथ्वीवरचे जीवन अनेक दु:खमय धाग्यांनी विणलेले आहे. राधा-कृष्ण, मीरा-कृष्ण यांचे प्रेम जसे अनेक अडचणींना तोंड देत राहिले, पण शेवटी सफल झाले तसे प्रेम नायिकेचे आहे. पण त्या प्रेमाला साफल्याचा क्षण दिसत नाही, असे कां असावे, ही वेदना साक्षात करणारा प्रश्न नायिका येथे विचारते आहे.

समर्पणशील वृत्ती :
=================

"विरहिणी" कविता उत्कट प्रेमाच्या समर्पणशील वृत्तीचे दर्शन घडविणारी कविता आहे. कृष्णाच्या स्मृती आठवून राधा बेहोश झाली. काळ्या यमुनेत तिने स्वत:ला झोकून दिले; पण पलीकडे जाण्याचे ती विसरली. धुंद कालिंदी नदीत भान हरपून राधा उभी राहिली आणि ती अंतर्बाह्य कृष्ण झाली. म्हणजे स्वत:चे भान हरपणे, या जगाचा विसर पडणे अशी अवस्था उत्कट प्रेमातून अनुभवास येते.

तृप्त प्रेम :
=========

"अचानक उजळीत" ही तृप्त प्रेमाची कविता आहे. आषाढाच्या महिन्यात सृष्टी चैतन्यमय होते. नायिकेचे मनही चैतन्यमय होते आणि ती निसर्गातील हिरवी राई, जुईची फुले, पाऊस यांच्याशी संवाद साधते, अचानकपणे नायकाच्या अनुपस्थितीतच तिला प्रेमाचा साक्षात्कार होतो.

विरहभावाचे चित्रण :
===============

"अनुभवसी कां कधी" या कवितेत विफल प्रेमाच्या व्यथा व्यक्त होतात. या कवितेची नायिका नायकावर एकतर्फी प्रेम करते. दोघांचे मीलन या जन्मी अशक्य आहे याची तिला जाणीव आहे. ती [illegible]री

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

रममाण आहे. परंतु तिला वाटते की माझी आठवण काढून त्याने एकांतात आसवे गाळावीत. ही तिच्या भग्न मनाला सांत्वन करणारी एक कल्पना आहे. तुझे व माझे मीलन या जन्मी अशक्य आहे. दोष कुणाचा हे कळत नाही. पण मी अजून मनामध्ये झुरते आहे. व तुझ्या मनामध्ये याच भावना आहेत अशी खुळी अपेक्षा नायिका करते. कधी शुभ्र चांदण्यात हसणारा मोगरा खुडायला गेले तर तुझा चेहरा स्मरतो; पण तू माझा राहिला नाहीस हा विचार सुरीसारखा सुखाच्या क्षणांचा छेद करतो. मन व्याकुळ बनते व तू मला सुखी संसारी विसरलास काय ? हा प्रश्न विचारायला नायिका भिते. मला उत्तराची अपेक्षा नाहीच. तू तुझ्या संसारी सुखी असावेस हीच इच्छा माझ्या मनामध्ये आहे तरी परंतु माझ्या स्मृतीने तू क्षणभरतरी दुःखी व्हावे तरच आपल्या प्रेमाचे साफल्य होईल असा तिला विश्वास वाटतो.

फसल्याची जाणीव :

"रे, तू फसवा" या कवितेत नायिका आपणाला प्रियकराने दिलेल्या प्रतिसादाबद्दल सांगते आहे. पाण्यावर फेस जसा क्षणकाळ टिकणारा असतो; तसा नायक आहे. इंद्रधनुष्य म्हणजे भास असते तसाच तो आहे. ती म्हणते, तू मला लाडिक बोल बोलून फसविलेस, दोन किंवा अधिक अर्थ त्यामधून निघतील असे बोल बोलून तू फसविलेस, भावनाहीन पण न बोचणारे असे तू बोललास त्याची आज तुला आठवणही नाही. पण मी मात्र ते बोल खरे मानले, त्या स्मृती मी कुरवाळीत बसले. त्या कटू स्मृती कवटाळून मी उगीचच दुःखी होते. कारण तू फसवा आहेस हे मला कळून चुकले आहे.

अस्वस्थ प्रीती

"लक्ष्मणरेखा" या कवितेचा नायक नायिकेस एकदा म्हणाला

द्वेष व प्रीत विसरून जायला शिकव नाही तर -

"ना तरि स्वन्मय होतां जीवन
लक्ष्मणरेषा मी ओलांडिन!"
[पृ. २५ ]

असे ती त्यास सांगते.

द्वंद्वात्मक भाव -

"वैरी" ही कविता प्रियकराविषयीचा प्रेम व द्वेष हा द्वंद्वात्मक भाव व्यक्त करणारी कविता आहे. मानवी स्वभाव असा नाट्यमय आहे की, नायकाचे दर्शन व्हावे म्हणून नायिका रात्रंदिवस झुरते आहे. त्याचे बोल कानी पडावेत म्हणून कान आतुर झाले आहेत. पण नायक जर रस्त्यावर दिसला तर नायिका आपले तोंड वळवून जाते. समोर आला तर हात जोडून पटकन पळते. जर बोलणे अपरिहार्य असेल तर "का, ठीक काय ?" असा प्रश्न ती विचारते. पण घरी आल्यावर तळमळते. प्रीती अशी परस्परविरोधी भाव व्यक्त करून नायिकेच्या मनातील ताण वाढविते.

दु:खी प्रेम -

न विसरण्याचा शाप असलेले मन "हे शापित वंचित मन" या कवितेच्या नायिकेचे आहे. तिचे मन स्मृतींच्या परिघातच घुटमळते. स्मृतींच्या ओढ्यांनी तिच्या मनाला भोवळ येऊन ते गरगरते आहे. परंतु मन मात्र त्या गूढ, टपोऱ्या डोळ्यांत व ओठांच्या हुकमी हास्यात गुंतलेले आहे. काळ्या केसात व पोलादी दणकट दंडाच्या घाटात मन रेंगाळत आहे. कधी कधी ते स्पर्शाची सीमा उल्लंघून शब्दांच्या पलीकडल्या प्रेमानुभवात बुडते त्याच वेळी त्याला प्रेमाचे कोडे उलगडते. मनाला नायिका निसर्ग व निळे आकाश दाखविते . सागराच्या मृदू व कुरळ्या लाटा दाखविते. त्याला गरुडकथा, रामकथा ऐकविते व त्यात रमविण्याचा प्रयत्न करते. मनावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करते, परंतु हट्टी मन एकुलत्या पोरा-

प्रमाणे हटून बसते, हट्ट धरते व वाकुल्या दाखवत ते पुन्हा हसते.कारण त्याला न विसरण्याचा शाप आहे.ते विरह विसरू शकत नाही.

स्मरणोत्सव -

"पुन:प्रत्यय" या कवितेत कवितेच्या नायिकेस पूर्वीच्याच भावनांचा अनुभव येतो. तिला आज पुन्हा एकदा सुखदु:खाचा नव्याने अनुभव येतो. पुन:प्रत्ययात पहिलाच अनुभव परत प्रत्ययास येतो. सोनचाफ्याचे बहरणे, धुंद मोग-याचे फुलणे, मोहाच्या फुलांनी वन भारविणे, स्वप्नमंदिरे खुली होणे हा सगळा आनंदोत्सव या नायिकेला आठवला तो एका तरुण मुलीचा प्रणयोत्सव पाहून, आणि नव्या पिढीची प्रेमाची प्रश्नोत्तरे ही आपलीच प्रश्नोत्तरे आहेत असाही सुखद अनुभव या नायिकेला आला. स्मरणोत्सव असा आगळ्या पद्धतीने येथे साजरा झालेला आहे.

प्रेमाचा आठव -

"करवंदांची ओंजळ" या कवितेत कवयित्रीने नायिकेच्या मनामध्ये निर्माण झालेल्या आठवणींचे वर्णन केले आहे. एकदा तो तिच्या ओंजळीमध्ये करवंदे टाकतो व तिच्याकडे रोखल्या दृष्टीने पाहतो. त्या नजरेनेच तो तिला आपल्याकडे आकर्षित करून घेतो. तिला प्रेमाची धुंदी चढते व ती त्या धुंदीतच जगत असते. आजही तिच्या मनातील प्रेमाची धुंदी पुरती उतरली नाही. तिच्या मनामध्ये आजही त्याचे प्रेम आहे.

आदर्श प्रीती -

"तू नव्हेस तो" या कवितेमध्ये कवयित्रीचा प्रेमाबद्दलचा आदर्शवाद दिसून येतो. कवितेमधून मी ज्याचे वर्णन केले तो आदर्श प्रियकर तू नव्हेस हे

हे तुला व मला ठाऊक आहे. लोकम तुला खिजवितात व मला बेईमान म्हणतात. आपला रत्नहार कोणी उघड्यावर टाकत नाही. या कवितेची नायिका आदर्श प्रीतीची अपेक्षा करते. लौकिक जीवनात प्रेमभंग झाला असला तरीही आपल्या मनातील प्रेमाची भावना कायम आहे. तिला कोठे तडा गेलेला नाही; पण जर आपण दुःखा करु लागलो, आपल्या प्रेमाचा रत्नहार उघडा टाकू लागलो तर आपणच आपल्या प्रीतीची मानहानी केली असे घडेल. तेव्हा आदर्श प्रीती जपण्याचा इशारा नायिका नायकास देत आहे.

## निर्व्याज प्रेम :

"अभिलाषेच्या पोटी" या कवितेत कवयित्रीने शुद्ध प्रेमाचे वर्णन केले आहे. शारीरसुख हा स्त्री-पुरुष संबंधातील एक महत्वाचा भाग आहे. अभिलाषा आणि उपभोग हेच काही प्रेमाचे सर्वस्व असते असे नाही. या प्रणयानुभूतीतून लाख-मोलाचे काही क्षण निर्माण होऊ शकतात. त्या क्षणांवरच स्त्रीया आपले जीवन कंठत असतात.

या कवितेमध्ये कवयित्रीने उपभोगापलिकडे निर्माण होणारे निखळ प्रेम व त्याचे महत्व वर्णन केले आहे.

## आठवणींचा उत्सव -

"नकळत" या कवितेतून आठवणींचा उत्सवच जणू साजरा केला जातो. नकळतपणे नायिकेच्या मनातील आनंदी भावना लोप पावते. एखादी लाडावलेली लेक असावी तशी ही भावना आहे. ती हसत नाही, बोलत नाही. सासर माहेरची तिला पर्वा नाही. तिच्यापायी नायिकेला केवढा छळ सोसावा लागतो.

पण ही भावना जेव्हा तुझी आठवण देते तेव्हा सहस्त्रमुखाने नायिका देखील हासते. आठवणींचा उत्सव उदास करणाऱ्या गोष्टी पुसून टाकतो.

प्रियकराची ओढ -

प्रियकराची ओढ हा भाव "त्या तसल्या सायंकाळी" या कवितेतून व्यक्त झाला आहे. नायिका सुस्नात होऊन देवाला जाते.ती कातरवेळ होती. आणि अशावेळी प्रियकर भेटतो. निरर्थक बोलतो. नायिकेचा विवाह झालेला आहे. पण प्रियकराचे प्रेम पूर्वीसारखे आहे. त्या क्षणी ही नायिका हळदी कुंकू व गळ्यातील मंगळसूत्र विसरून हासते. प्रियकराला प्रतिसाद देते. तिच्या मनातील प्रेमभाव अजूनही चिरंतन आहे.

चिरंतन प्रेम -

चिरंतन प्रेम हा भाव "आषाढ" या कवितेतून व्यक्त झाला आहे. हा प्रणयी आषाढ म्हणजे नायक आहे,तर श्रावणधारा चांदण्या नायिका आहे. ही नायिका या जीवनदायी आषाढाच्या सहवासात न्हाऊन घेते. आपल्या तारुण्यावर एक लकाकी चढवते.या आषाढाने हा सारा आनंद व उत्साह निर्माण केला आहे. म्हणून तर या आषाढाशी सख्याबरोबर ती खुलेपणाने आपल्या मनीचा भाव व्यक्त करते.

राधा-कृष्ण प्रेम -

राधा कृष्ण प्रेम हा भाव "अजून नाही" या कवितेतून व्यक्त झालेला आहे. राधा-कृष्ण, मीरा-कृष्ण यांच्या प्रेमावर प्रेमाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले; पण अजूनही सूर काही जुळत नाही.ते प्रेम उत्कटपणे एकरूप

पावत नाही. ही खंत नायिका व्यक्त करते.

या प्रेमचित्रणाविषयी डॉ. मीना जोशी यांचा अभिप्राय वरील विवेचनाला बळकटी आणणारा आहे. त्या म्हणतात, "त्यांच्या [पद्मा गोळे यांच्या] काव्यातील प्रेमाच्या चित्रणात सुख-समाधान, तृप्ती यांचा अनुभव अनेकवेळा दिसतो. त्यावरून जीवनात सुखाशी त्यांचे नाते अधिक जडलेले असावे असा तर्क वाचकांच्या मनात जागृत होतो. पण त्यांच्या काव्यात सुखाच्या बरोबरच काही वेळा दु:खाचीही प्रतीती येते. [१]

त्याचप्रमाणे त्यांच्या प्रेम कवितेविषयी डॉ. प्र.न.जोशी यांचे विधानही या मतास बळकटी देणारे आहे. ते म्हणतात, " प्रीतीपथावर", नीहार", "स्वप्नजा" इत्यादी काव्यसंग्रहांनी पद्मा गोळे [जन्म १९१३ ] यांचे नाव एक यशस्वी कवयित्री म्हणून उदयास आले. त्यांच्याही कवितांतून प्रणयाच्या विविध छटा नाजूक व सूचक पद्धतीने व्यक्त झालेल्या दिसतात. शालीन, संयमी, सुसंस्कृत व मुग्ध असे एक मोहनीय व्यक्तिमत्व त्यांच्या कवितांतून प्रतीत होते." [२]

वात्सल्य हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत.

आई झाल्यावर [पृ.१], असुं दे ग शेळीबाई [पृ.२], माझा सुधीर [पृ.७].

हे आशयसूत्र मातृप्रेमाची जाणीव, विनवणी, मुलाचे कौतुक या अंगाने स्पष्ट झाले आहे.

मातृप्रेमाची जाणीव -

" आई झाल्यावर" या कवितेत कवयित्रीला मातृत्व प्राप्त झाल्यानंतर आलेल्या अनुभवांचे वर्णन केले आहे. मातृत्व प्राप्त झाल्यावर कवयित्रीस आईच्या

वेदनांचा अर्थ समजला, तसेच हळव्या मनाची व दु:खाची जाणीवही झाली. आईच्या प्रेमळ डोळ्यांमधील वात्सल्याचा, रागाचा हळुवारपणा हे सर्व आज समजू लागले. ख-या अर्थाने कवयित्रीस आईची भूमिका समजली. आज त्याच वत्सल दृष्टीने ती आपला बाळ पाहते. बाळाच्या सुखात ती आपले सुखदु:ख मानते. आई होण्याचे भाग्य मला लाभल्यामुळे जीवनाला पूर्णत्व आले. बाळाला हृदयापाशी धरताना वाटते, मला पुन्हा एकदा बालपण यावे.

विनवणी -

"असू दे गं शेजीबाई" या कवितेत मातेचे मत्सरापलीकडील वात्सल्य दिसून येते. शेजारीण आपल्या मुलास रागावते म्हणून तिचा राग न करता माता आपल्या मुलास रागावू नये म्हणून विनवणी करत आहे. माझा बाळ सावळा आहे. गोकुळाचा कृष्ण सावळा नव्हता का ? ती पुढे म्हणते की, माझा मुलगा खोडकर आहे, हे खरे आहे. तुझे घर मोठे आहे व आपला जुना शेजार आहे. तू बाळाची गा-हाणी सांगू नकोस, कारण तो अजाण आहे व तू मायाळू आहेस. तसेच तू त्याच्याकडे डोळे वटारून पाहू नकोस. बाळ म्हणजे प्राजक्ताचे फूल आहे. ते कोमेजून जाईल. तू थोराची लेकसून आहेस. असे तोडून बोलू नकोस. बाळाच्या पायगुणाने तुझी वंशवेल फुलेल असा आशीर्वाद देणारी माता या कवितेत दिसते.

मुलाचे कौतुक -

कवयित्रीच्या दोन मुलांपैकी लहान मुलाचे नाव सुधीर. तो रंगाने सावळा आहे. "माझा सुधीर" या कवितेत कवयित्रीने आपल्या मुलाचा मोठेपणा वर्णन केला आहे. मोठेपणा वर्णन करताना वात्सल्यापोटी अतिशयोक्तीही झाली आहे. सुरुवातीपासूनच ती आपल्या मुलाच्या एकेका अवयवाच्या मोठेपणा-

संबंधी सांगते. माझा सुधीर सावळा आहे म्हणून लोक हिणवतात व कोणी कशाचा तर कोणी कशाचा दिमाख दाखविते. ती म्हणाते की तुझ्या अंगकांतीपुढे निळे आकाश व शुभ्रहंसाचाही रंग फिका आहे. तुझा केशगंध तर अत्तराचा किंवा फुलांचा सुगंध यापेक्षा श्रेष्ठ आहे. पाखरांची पिसे व सशाचा स्पर्श यापेक्षा बाळाचे जावळ कोमल वाटते. आकाशातील अरुणोदया-पूर्वीचा लालिमा किंवा गुलाबाचा लाल रंग हा बाळाच्या गालापुढे निस्तेज आहेत. हरणाचे डोळे किंवा कमळाच्या पाकळ्या यापेक्षा सुधीरचे डोळे सुंदर आहेत. साखरेची मधुरता किंवा साखरझोप हे सर्व तुझ्या पाप्यापुढे काहीच नाही. या कवितेत मातेचे आपल्या मुलाबद्दलचे वात्सल्य व त्या वात्सल्यापोटी तिने केलेले त्याचे कौतुक दिसून येते. आईला आपले बाळ किती अपूर्व वाटते हे समजून येते.

भगिनीप्रेम हे आशयसूत्र असणारी कविता "माझ्या पाठच्या बहिणी" [पृ. १०] ही आहे.

हे आशयसूत्र भगिनीभेट या घटकाने स्पष्ट झाले आहे.

भगिनीभेट -

"माझ्या पाठच्या बहिणी" या कवितेत कवयित्रीस आपली [illegible] बहीण माहेरी भेटते व त्यानंतर जुन्या स्मृती जागृत होतात त्याचे वर्णन येते. माहेरी विवाहानंतर दोघीही बहिणी एकमेकींना भेटतात. ही भेट म्हणजेस ग्रीष्म ऋतूतील वाऱ्याच्या झुळकेसारखी भेट वाटते. दोघींची भेट झाल्या-नंतर बालपणीच्या आठवणी येतात. बालपणीचे आपले प्रेम म्हणजे जणू पाडाचा मधुर आंबाच. तुझे व माझे घरकुल माहेरास आजही शोभिवंत पऱ्यांच्या नगरीप्रमाणे इथे आहे. आज तुझे व माझे गाव भिन्न-भिन्न आहे. पण

हृदयातला भाव मात्र तोच आहे. तुझे मऊ दाट केस मी माझ्या हातांनी तुझे विंचरले होते त्याची स्मृती आजही आहे. चार दिवस आपण बालपणीच्या आठवणी चिंचा आवळे याडात उजाळल्या सारखे वेष्ट करून हिंडलो. कारण ह्या बहिणी -बहिणी आहेत हे ओळखू यावे. या माहेरच्या चार दिवसात तू आई आहेस तसेच मी गृहिणी आहे हे हुडपणे आपण विसरून गेलो; पण आज आपआपल्या घरी जाताना डोळ्यांत पाणी उभे आहे. कधीही ते ओघळू शकेल.

हु सखी प्रेम हे आशयसूत्र असणारी "सखे तुझे पत्र आले" [पृ.१३] ही कविता आहे.

हे आशयसूत्र पत्रभेट या अंगाने व्यक्त झाले आहे.

पत्रभेट -
====

१ कवयित्री संजीवनी मराठे व पद्मा गोळे या शालेय जीवनापासूनच्या मैत्रिणी, दोघी एकमेकींना काव्यातून पत्रे पाठवीत असत. संजीवनी मराठे यांनी पाठविलेल्या पत्रानंतर मनामध्ये निर्माण झालेल्या भावना "सखे तुझे पत्र आले" या कवितेत व्यक्त झाल्या आहेत. त्या म्हणतात, सखे तुझे पत्र म्हणजे जणू श्रावणमासच वाटतो. या श्रावणमासातील पावसाच्या सरीसंगे कोवळे ऊन जसे प्रसन्नता देते तसे तुझे पत्र आहे. तुझे पत्र मनामध्ये अनेक स्मृती जागृत करते. पत्रभेटीनेच आपण पंचमीची गाणी गाऊ या. संसाराच्या फेऱ्यामध्ये भोवळ यायला नको म्हणून गालावरचे आसवांचे ओघळ पुसून काही क्षण आपण खेळू या. माहेरची आठवण म्हणून नाग पूजू या व फुले व लाह्या उधळू. एकमेकींना प्रेमाचे उखाणे घालू व फुगडीमध्ये धुंद होऊन जाऊ. जीवनामध्ये सुवर्णाचे कण वेचू. तुझी व माझी भेट ही श्रावणसौख्य ठरो व मनातील तगमग शांत होवो अशी इच्छा कवयित्री व्यक्त करते.

काव्यनिर्मितीची कैफियत असणारी "स्वप्नमयी" [पृ.२६] ही कविता आहे.

हे आशयसूत्र कविता व कवी संबंध या घटकाने स्पष्ट झाले आहे.

## कविता व कवी संबंध -

"स्वप्नमयी" या कवितेत कवयित्रीने कविता ही आपली मुलगी कशी आहे हे सांगितले आहे. तिचा बांधा राजहंसासारखा गोल आहे तर चरणामध्ये नागिणीची चपळाई आहे. तिचे शरीर ताज्या दुधासारखे तर स्पर्श चांदण्या प्रमाणे शीतल. तिच्या हसण्याबोलण्यात धीटपणा तसेच गोडवाही आहे. कविता म्हणजे निसर्गाची नवलाई आहे. तिच्यामुळे आपणास सुख मिळते. कवयित्रीची तयारी आहे तिच्यासाठी पुण्याई पणास लावण्याची कवयित्रीची तयारी आहे. तिला कुणाची दृष्ट लागू नये असे कवयित्रीस वाटते. मनामध्येच तू सुखी रहा असे आपल्या कवितारूपी अपत्यास कवयित्री सांगते.

आत्मविष्कारांची ओढ हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत.

"स्वप्नात आज मी वावरते" [पृ.१७], "मी वेडी" [पृ.२०,२१]

"आम्ही कुलीनांच्या कन्या" [पृ.२५], "एकटे बसाया" [पृ.३०]

"अवखळ ये पोरीसमान" [पृ.३१,३२], "आज बाहेरच जावे वाटेना" [पृ.४०]

"मी माणूस " [पृ. ३५ ते ३७], "कसे समजावू तुला" [पृ.४१]

"मन माझे [पृ.४७], "वाट" [पृ.५३.]

हे आशयसूत्र पूर्णत्वाची ओढ, निर्मितीचे भान, कुलीनांच्या कन्यांचे कौतुक, एकांतप्रियता, प्रभातसौंदर्य, स्त्रीपुरुष समानता, बदलाचा स्वीकार, समृद्ध मन, घराची ओढ व मनाची अस्वस्थता या घटकांनी स्पष्ट झाले आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## पूर्णत्वाची ओढ -

"स्वप्नात आज मी वावरते" या कवितेवर तांबे यांच्या "नववधू प्रिया मी" या कवितेचा प्रभाव जाणवतो. या कवितेत कवयित्रीस पूर्णत्वाची ओढ लागल्याचे दिसते. कवितेच्या शेवटी कवयित्रीने "मरणातुनि जीवन की बाले गाते।१" असे म्हटले आहे. तिला जीवन म्हणजे स्वप्न वाटते.ते सुखदु:खाचे संमेलन आहे. जीवनात संकल्पनांना जन्म होतात तर आशांना बहर येतो. कधी आठवणींचे अमृत पाझरते तर कधी डोळ्यांमध्ये पाणी साचते. जीवन म्हणजे स्वत:जवळ कस्तुरी असूनही तिच्या शोधासाठी भटकणाऱ्या कस्तुरीमृगासारखे कवयित्रीस वाटते. जीवनांत असेही घडते.-

देह पिसापरि हो हलका फुल
फुलापरि उरीं दाटे परिमल
परिमलात ये ज्योत्स्ना शीतल
तरि चांदण्यात या मी जळते। [पृ.१७]
जीवनात अथांग तळमळ आढळते.

ओठावर हसू तर डोळ्यांत आसू असतात. खरे तर मरणातच जग जगते, म्हणजे दुसऱ्यास त्याची जागा मिळते.या कवितेत कवयित्रीने जीवनविषयक तत्वज्ञान मोजक्या शब्दांत सांगितले आहे.

## निर्मितीचे भान -

कवयित्रीची जीवनाबद्दलची ओढ व निर्मितीचे भान असणारे मीपण याचे दर्शन "मी वेडी" या कवितेत घडते. जीवाभावाची हळवी, निष्ठूर, रडवी सुंदर कोडी मी उलगडण्याचा प्रयत्न करते. ती उलगडताना अधिकच गुंतागुंतीची बनतात असे कवयित्री म्हणते. सुरगाठी, निरगाठी जर तोडल्या तर जगता येईल

काय? त्यावाचून मी क्षणभरतरी जिवंत राहू शकेन का ? आणि जर आयुष्यातील भावबंधाचे जरतारी रेशमी धागे तोडले तर आपण उन्मळलेल्या वेलीप्रमाणे कोसळू असे कवयित्रीस वाटते. जर हे सर्व धागे तुटले तर पुन्हा नवे काहीतरी निर्माण करेन व त्यामध्ये कोळ्याच्या जाळ्यातील तडफडणाऱ्या माशाप्रमाणे जगेन, परंतु सर्जन सोडणार नाही. पुन्हा नवी कोडी सोडविण्याचा प्रयत्न करेन. सृजनाचे कवयित्रीस वेड आहे.

कुलीनांच्या कन्यांचे कौतुक -

कवयित्रीचा जन्म हा सरदार पटवर्धनांच्या खानदानातच झाला. त्यामुळे खानदानीपणाचे सर्व संस्कार त्यांच्यावर झाले. "आम्ही कुलीनांच्या कन्या" या कवितेत कवयित्रीने कुलीनांच्या कन्या कशा आहेत ते सांगितले आहे. आम्ही कुलीनांच्या कन्या म्हणजे पानाआडच्या चाफेकळ्या आहोत. कुणीच प्रदर्शन न करता मुग्धपणे कार्यभाग साधू. आम्ही प्रकट वाद न घालता चार शब्द हिरे-माणकांप्रमाणे तोलून बोलू. आम्ही आमचे प्रेमही बोलून दाखविणार नाही. आमचे प्रेम फक्त डोळ्यांतच समजेल. जर डोळा वाकडा करून कोणी पाहील तर वीज कडाडल्याप्रमाणे बोल ऐकायला मिळतील. घरचे कर्ते पुरूष रागाने नोकराला जेव्हा आज्ञा देतात तेव्हा आमच्या कंकणांच्या किणकणाटाने त्यांच्या शब्दांना अटकाव होतो. म्हणजे त्यांचे रागाचे शब्द थांबतात. आमचे पाऊल कधीच घराचा उंबरा विनाकारण ओलांडणार नाही. सर्वत्र आमच्या कर्त्या पुरूषांचा दरारा आहे. आमचे सर्व व्यक्तिमत्व घराण्यातच एकरूप झालेले आहे. आपल्या सुगंधाने उदबत्ती जसे घर व्यापते तसे आम्ही आमच्या व्यक्तिमत्वाने घर व्यापतो. या कवितेत कवयित्रीने कुलीनांच्या कन्यांचे श्रेष्ठत्व व गुण सांगितले आहेत.

## एकांतप्रियता -

"एकटे बसाया" या कवितेत कवयित्रीने आपले कडू गोड अनुभव वर्णन केले आहेत. एकटे बसण्याची कवयित्रीस भीती वाटते. कारण उरामध्ये अनेक स्मृती दाटून येतात. मनाचे बंध तुटतात व सहजपणे डोळ्यांत पाणी साचते. त्या डोळ्यांतील पाण्यावर पुन्हा स्मृतीचे प्रतिबिंब उमटते व ते पाहिल्यावर एकटेपण नाहीसे होते, परंतु क्षणातच स्मृतीचे पोळे फुटते व गोड स्मृतींचा मध ठिबकतो. सर्वांग गोड स्मृतींनी पुलकित होते, तर कधी कडू अनुभवांची माशी डंख मारते. कडू स्मृतींचा डंख व गोड स्मृतींचा मध या दोहोंचीही नशा चढते. व पुन्हा एकटे बसावेसे वाटते. या कवितेत कवयित्रीस एकांत प्रिय असल्याचे जाणवते. या एकांतातच कडू व गोड आठवणींना उजाळा मिळतो.

## प्रभात सौंदर्य -

"अवखळ ये पोरीसमान" या कवितेत कवयित्रीने सकाळचे सौंदर्य टिपले आहे. अवखळ पोरीप्रमाणे सकाळ ही अवकाशातील सोनेरी छटा [सोनेरी फुलमाळ] तोडून येते. त्याचवेळी घरटयांतून पक्षी बाहेर पडतात. आनंदाचे मोरपीस होऊन गालावर गुदगुल्या करत सकाळचा वारा हा स्वतःशीच गाणे म्हणतो व मला उखाणे घालतो. सकाळचे केशरी ऊन म्हणजे जणू मांडीवरील लहान लुसलुशीत बाळच. सकाळचे गवतावरचे दवबिंदू डोळे मिचकावून हसतात व आपले हात लावून माझे वस्त्र भिजवितात, वेलीवर फुले फुललेली आहेत व तिची मैत्रीण असणाऱ्या टेकडीने हिरवा परकर घातला आहे व जरतारी ओढणी ओढली आहे. ती मला खुणावते, अवखळ पोरीप्रमाणे ये असे म्हणते. मग मलाही वाटते केस मोकळे सोडून व परीसारखा निळा वेष करून तरल वाऱ्यासारखे धावावे.

सोनेरी उन्हात मिसळून स्वतःशी गुणगुणत अवखळ पोर बनावे. फुलासारखे सुंदर बनून जग प्रसन्न करावे. आकाशामध्ये पक्षी बनून विहार करावा. नम्र गवताच्या पात्यावर दवबिंदू होऊन नटवावे व माझी मी न राहता सुंदर व प्रसन्न सकाळ व्हावे असे कवयित्रीस वाटते.

## स्त्रीपुरुष समानता -

"मी माणूस " या कवितेत कवयित्रीने अवघ्या स्त्री जगताची व्यथा मांडली आहे. स्त्रीसुद्धा एक माणूसच आहे हे कवयित्री सांगते. या कवितेमधून कवयित्रीच्या चिंतनशील व्यक्तिमत्वाचा प्रत्यय येतो. माणसाच्या वागण्या-बोलण्यातील विसंगती व सामाजिक वास्तव कवयित्रीने या कवितेत सांगितले आहे. प्रेम, काम ह्या सा-या गोष्टी नकली नोटांप्रमाणे खोट्या आहेत. हा सर्व देखावा आहे. परस्परांची फसवणूक आहे. स्त्री ही देवी, सखी हे सुद्धा खोटे आहे. स्त्री म्हणजे केवळ चलनी हुंडी आहे. ती कुंडीप्रमाणे गौण वस्तू आहे. सगळे काही खोटे आहे. ही ओरडसुद्धा खोटीच आहे, या सर्वांमध्ये काहीतरी खरे दडले आहे. ते शोधून काढण्यासाठी रक्ताचे मोल दयावे लागेल. तडजोड करावी लागेल, झगडावे लागेल, मारझोड करावी लागेल, तेव्हां खरे बाहेर येईल. हवे तर त्यासाठी आपल्या शस्त्रांना धार लावली पाहिजे व अंगावर वार सोसले पाहिजे व त्यामधून जे अस्सल व अनमोल जन्माला येईल ते उचलले पाहिजे. कवयित्री पुढे म्हणते -

" नाही मी नुसती मादी
मी माणूस माणूस आधी" [पृ.३७]

पैशासाठी लाचार होणारी व शोभेसाठी आसुसणारी मी नार नव्हे, तर मी आधी माणूस आहे. माणूस म्हणून मी झगडणार, हसणार आणि मरणार.

माणसावर माझे प्रेम आहे व माणसासाठीच काम व धर्म आहे. माणसामधूनच स्त्री निघेल व ती जगाची भाग्यविधाता बनेल. स्त्रीला जेव्हा माणूस म्हणून वागणूक मिळेल तेव्हा त्यातून खरे सुख निर्माण होईल. सगळा झगडा संपेल.

बदलाचा स्वीकार -

"कसे समजावू तुला" या कवितेत कवयित्रीने परिस्थितीनुसार होणा-या बदलांचा स्वीकार केला आहे. हिरवा रंग सरला आहे व उष्ण मातीचा करडा रंग भरला आहे. यौवनाचा काळ संपून गेला व उतरती अवस्था आली. काल-मानानुसार पूर्वीची असणारी कार्यशक्ती संपली आहे. तो उत्साह, जोश राहिला नाही. हे सर्व खरे असले तरी मन मात्र अद्याप तसे मानायला तयार नाही. त्यामुळे कवयित्री म्हणते की तुला कसे समजावू हे कळत नाही.

ड) समृध्द मन -

कवयित्री आपल्या समृध्द मनाविषयी "माझे मन" या कवितेत सांगते आहे. खळखळणा-या लाटांसारखे हिरव्या गर्द अशा काठासारखे व सोनेरी वाटांसारखे म्हणजेच सुसंस्कृत वळणाचे माझे मन आहे. माझे मन शीतल पण स्थिर ता-यासारखे, तसेच मनाला आल्हाद देणा-या वा-यासारखे व अतिचंचल, कशासही न स्पर्शिणा-या पा-यासारखे आहे. माझे मन हे संध्येच्या मेघा-प्रमाणे विविध रंग धारण करणारे आहे.ते कमळाच्या मृदू परागासारखे कोमल आहे. तर ते राधेचा प्रणयराग आळविते व सीतेची चिंतन तगमग त्यामध्ये असते. गरुडाच्या पंखाचे आसमान भरारी मारण्याचे बळ त्यात आहे, तर नास्तिकत्वाच्या शंका चिरथ्या मनात येतात. ते मुलखाचे हट्टी आहे. क्षणामध्ये ते नाराज होईल तर क्षणात प्रसन्न होईल. या कवितेत कवयित्रीने मनाची अवस्था

अवस्था

कशीशी असते ते सांगितले आहे.

घराची ओढ -

. "आज बाहेरच जावे वाटेना" ही कविता घराच्या ओढीचे वर्णन करणारी आहे. कलावंताच्या चित्राकृतीचे रंग कलाकृतीवर उमटत असतात. बाहेर संध्याकाळ, नदी आकाश सगळेच नटलेले होते, पण कवयित्रीचा जीव काही त्यांच्याशी समरस होत नाही. नि:शब्द अशी कोणाची तरी चाहूल लागते. त्या चाहूलीचा माग घेण्याचा प्रयत्न कवयित्री करते. पण ती चाहूल, तो भास चाचाच तिला ध्यास लागतो. त्या ध्यासातून तिचे मन उठत नाही. त्यामुळे तिला बाहेर जावेसे वाटत नाही. या घराचीच माया तिला ओढत असते. त्या मायेच्या कक्षेच्या बाहेर तिला जावेसे वाटत नाही.

मनाची अस्वस्थता -

'वाट' [पृ.५३] ही आत्मचिंतनपर कविता आहे. नायिका पाहते की, क्षितीजाच्या कडेवर काजळाचे बोट फिरते आहे. म्हणजेच अंधार दाटलेला आहे. त्यातून अंधुकशी पायवाट जाते आहे. वेळ संध्याकाळची. वृक्षवेली शांत आहेत. जी पाखरे दूर उडून गेली होती ती घरट्यात परतली आहेत. खरेतर नायिकेला देखील घराची ओढ लागायला हवी होती, पण ती लागत नाही. भिजलेल्या डोळ्यांतून समोर कोरडी वाटच येते. ओढ का लागत नाही ते कळत नाही. फक्त वाट मात्र पायात वळवळत असते. माणसाचे अनेकदा असेच होते. उत्कट ओढीची अपेक्षा असताना घडत मात्र काहीच नाही. हा अस्वस्थ करणारा अनुभव येतो.

निसर्गाची ओढ हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत.

म 'मध्यरात्री [पृ.१४], येतो पाऊस [पृ. ४८,४९], शुक्रतारा [पृ.१८] भाद्रपदातील विनोदी पाऊस [पृ.२६], करीत लवलव [पृ.५०,५१ ]

. हे आशयसूत्र अंधारातील सृष्टीदर्शन, पाऊस व मनसंबंध, मिस्किल वातावरण, निसर्गाचे वैभव व कल्पनावैभव या घटकांनी स्पष्ट झाले आहे.

अंधारातील सृष्टीदर्शन -

"मध्यरात्री" या कवितेत कवयित्रीचे प्रसन्न व्यक्तिमत्व दिसून येते. मध्यरात्री कवयित्रीस कशामुळेतरी जाग येते, कसलीतरी दुष्ट स्वप्ने झोप घालवितात गच्चीवर आल्यावर कवयित्रीस सृष्टीसखी मखमली अंधारामध्ये विसावा घेत असल्याचे दिसते. मध्यरात्रीच्या शरीरात सर्व भाव विसावा घेत असल्याचे दिसते. आषाढाच्या आड सर्व चांदण्या लपल्या होत्या व क्षितिजाच्या मांडीवर चारी दिशा झोपल्या होत्या.म बकुळीची सळसळ थांबली होती. ध्यानस्थ ऋषीप्रमाणे पिंपळ बसला होता. जाईजुईची कुजबुज म्हणजे हालचाल बंद झाली होती. वारासुध्दा अधांतरी झोपला होता. रस्त्यावर दिवा एकटाच जळत होता. सारी सृष्टी जणू परमेश्वराचा संदेश ऐकण्यासाठी शांत झाली होती. ही सर्व दृश्ये पाहून कवयित्रीची वाईट स्वप्ने दूर पळतात व कासावीस थांबते. सृष्टीशी तिचे नाते पुन्हा जुळते.

पाऊस व मनसंबंध -

"येतो पाऊस" ही कविता कवयित्रीच्या मनावर पावसाचा कसा परिणाम होतो हे व्यक्त करणारी आहे. माणसाच्या जीवनातील प्रीती, दुःख या सगळ्यांना मुखरित करणारा हा पाऊस आहे, हा पाऊस माझ्या ह्दयातील जहर म्हणजे वाईट विचार शोषून घेतो. माझ्या जीवाच्या कळा थांबतात आणि माझ्यातील निर्माणशक्ती परत चैतन्यमय होते असे कवयित्री म्हणते.

मिस्किल वातावरण -

"भाद्रपदातील विनोदी पाऊस" ही निसर्गविषयक कविता आहे. हा

पाऊ

पाऊस विनोदी आहे. तो एकटा आलेला नाही त्याच्या सोबत खट्याळ वारा आहे, संध्याराणी स्वप्नात रंगलेली आहे, पाऊस व वारा तिच्या लाल पदराला हळूच ओढत आहेत. खट्याळ वा-याच्या हातात बुचतल्या सुगंधी पेला आहे. त्या पेल्यात सरबत घेऊन संध्याराणीने उठावे असे तो लाजत लाजत म्हणतो आहे. एक उत्कट नाट्य या सात ओळींच्या कवितेतून कवयित्रीने समर्थपणे उभे केलेले आहे.

निसर्गाचे वैभव -

"शुक्रतारा" ही निसर्गविषयक कविता आहे. या कवितेची शब्दकळा ही बा.भ.बोरकरांशी नाते सांगणारी आहे. आकाशातील शुक्रतारा आणि सभोवतालीचे तारांगणं पाहता पाहता सप्तर्षी शनि-मंगळ यांची स्वभाववैशिष्ट्ये नायिकेला जाणवली; पण शुक्राच्या प्रेमळ व ता-याने एक वेगळाच भावानुभव सादर केला. शुक्राचा तारा पाहिल्यावर नायिकेचे डोळे भरून आले.तो तारा दुरूनच प्रेमाने नायिकेस कुरवाळीत होता. निशा आणि उषा यांची कोमल स्वप्ने उलगडून दाखवत होता, नायिकेचे मन मोहरून येते. अश्रूरूपाने ती आपली कृतज्ञता व्यक्त करते. शुक्राचा तारा निर्व्याजपणे आपले प्रेम व्यक्त करत होता

कल्पनावैभव-" "करीत लकलव" [पृ.५०,५१] ही कविता आपल्या निळसर मृदू पंखांची लकलव करीत व डोळ्यांची उघडझाप करीत. एखादा इंद्रनिळाचा लोलक किंवा गोकर्णीचे फुल जादूने तरळत जावे तसा इवलासा निळा पक्षी फिकट केशरी आकाशामध्ये संथ गतीची नाजूक रेषा आखीत एकटाच चालला आहे. तेव्हाच खालच्या हिरवळीतून दुसरा निळा पक्षी उडाला व पहिल्या बरोबर मूकपणाने समांतर मार्गक्रमण करू लागला. जणू एखादया नवयुतीच्या दोन गालावर आसवे हळूच ओघळतात किंवा कर्णफुले झुलवीत तसा एक लयीत लकलव करीत तो पक्षी चालला होता.

पक्षी आणी नवयुवती या दोघांपैकी पक्षी आनंदी आहे तर नवयुवती दु:खी आहे. या दोघांचे भावानुभव समांतर चालले आहेत,पण एकाएकी हे स्वप्न मिसळले जाते,तो पक्षी म्हणजे त्या नवयुतीचा प्रियकर आहे आणि नंतर ते एकमेकांपासून दूर जातात. शब्दांनी काय पण केवळ नजरेनेदेखील ते निरोप घेऊ शकत नाहीत आणि कवयित्रीसमोरचा तो पक्षी म्हणजेच त्या स्वप्नातला प्रियकर उडून गेला आणि ती पुन्हा एकटी राहिली.

UNIVERSITY LIBRARY

## अभिव्यक्ती विचार :

"ओहार" हा काव्यसंग्रह वाचताना माधव ज्युलियन, यशवंत या रविकिरण मंडळातील कवींची अशी आपणास आठवण येते. त्याचप्रमाणे तांब्यांच्या कवितेची ही आठवण येते. या काव्यसंग्रहातील रचना जशी छंदोबद्ध आहे, तशीच ती मुक्तछंदात्मकदेखील आहे. "याच काही क्षणासाठी" (पृ.८) "अजून नाही" (पृ.५५) या कवितांमधून छंदोबद्धतेचा प्रत्यय येतो.

"शुभ्र पुतळा बुद्धाचा पुष्पहारे सुशोभित उदबत्तीच्या
सुवासाने मन होते उल्हसित"

(पृ. ८)

"याच काही क्षणासाठी" या कवितेमधील या छंदोबद्ध ओळी आपणासमोर त्या खोलीतील प्रसन्न वातावरण अगदी सहजपणे साकार करतात. तर

"अजून नाही, अजून नाही
आला का रे, तो सुवर्णक्षण ?
देशाही हो बाळूनि ज्या क्षणि
आणि तिलाही हो शिवदर्शनि ।

या "अजून नाही" कवितेमधील ओळी दुःखाचा कालखंड संपला नाही व सुख दृष्टीपुढे येत नाही हे सांगतात. अशाच प्रकारच्या "आई झाल्यावर" (पृ. १), "माझा सुधीर" (पृ.७) "अभिलाषेच्या पोटी" (पृ.५९) इत्यादी कविता आहेत.

छंदोबद्ध रचनेप्रमाणे काही कवितांमधून मुक्तछंदात्मक रचना देखील येते. त्यामध्ये "येतो पाऊस" (पृ.४८) "आषाढ" (पृ.५६) या महत्त्वाच्या कविता आहेत.

येतो पाऊस -
" धुंद सुगंधित मत्त वादळी
स्पर्शुनी जातो उभिच वेडा
कणाकणाला आसुसलेल्या "

(पृ. ४८)

या ओळी वरील शब्दांत न उल्लेखिलेल्या मनाचा निर्देश करतात. सामान्यपणे मुक्तछंद विचारसौंदर्य अधिक कलात्मकतेने स्पष्ट करतो. "आषाढ" या कवितेतील नायिका नायकाला प्रीतीची उत्कटता निसर्गातील चैतन्यमय दृश्याने स्पष्ट करते.

"प्रीतीला का कोठे असते वय ? शरीर ? कथा ?
चिरयुगायी आषाढ तू,
अन् शाश्वत यौवना धरित्रीची मी !
[पृ.५६]

कवयित्रीने काव्यरचना काही ठराविक ओळीत केलेली नाही. कविता लिहिताच्यावेळचा मूड, कवयित्रीचे चिंतन यामुळे काव्यरचनेत अशी विविधता आलेली दिसते.

X

<u>ओळींच्या संख्येनुसारी गट -</u>

२ ओळींची ६ कडवी असणाऱ्या कविता -

"असू दे ग शेजीबाई", "रहदारीच्या पथापलीकडे"

२ ओळींची ७ कडवी असणाऱ्या कविता -

"आई झाल्यावर", "ये अवचित नवजीवन".
"सखे तुझे पत्र आले". "शेजारी". "नेभळा".
"स्वप्नमयी"

२ ओळींची ८ कडवी असणाऱ्या कविता -

"माझा सुधीर", "संध्याकाळ उलटली"
"आम्ही कुलीनांच्या कन्या". "पुन:प्रत्यय"

२ ओळींची ९ कडवी असणाऱ्या कविता -

"मध्यरात्री", "माहेरास जावयाचे".

२ ओळींची १० कडवी असणाऱ्या कविता -

"याच काही क्षणांसाठी", "शुक्रतारा",
"अचानक उजळीत"

२ ओळींची १३ कडवी असणाऱ्या कविता -

"माझ्या पाठच्या बहिणी"

४ ओळींची दोन कडवी असणाऱ्या कविता -

"कसे समजावू तुला" "तू नव्हेस ते",

"अभिलाषेच्या पोटी"

४ ओळींची ३ कडवी असणाऱ्या कविता -

"होते जगात मी मुदे", "वैरी",

"या रस्त्यातच", "अघोर येते"

४ ओळींची ४ कडवी असणाऱ्या कविता -

"कटी-कटी", "अक्षरांच्या संपुटी", "वाट"

४ ओळींची ५ कडवी असणाऱ्या कविता -

"एकटे बसाया", "अजून नाही"

४ ओळींची ६ कडवी असणाऱ्या कविता -

"नको विचारू अर्थ" "विडा",

"लक्ष्मणरेषा"

५ ओळींची ३ कडवी असणाऱ्या कविता -

"अजून आहे बाकी"

४ ओळींची कविता -

~~"करवंदाची ओंजळ"~~

"प्रेम नको वाटाया"

६ ओळींची कविता -

"करवंदाची ओंजळ"

७ ओळींची कविता -

"भाद्रपदातील विनोदी पाऊस"

१४ ओळींची कविता -

"अनुभवशी का कटी"

२१ ओळींची कविता -

"नाही जायचे अशाने", रेंगू फसवा"

२२ ओळींच्या कविता -

"स्वप्नात आज मी वावरते", "ही हिरवी हिरवी राई"

२८ ओळींच्या कविता -

"मी वेडी", "अवखाळ ये परीसमान"

३२ ओळींच्या कविता -

"आज बाहेरच जावे" "चाटैन्त"

३४ ओळींची कविता -

"येतो पाऊस"

३९ ओळींची कविता -

" आषाढ "

४४ ओळींची कविता -

"उगवला शुक्र"

५७ ओळींची कविता -

"झपाटलेले झाड"

८६ ओळींची कविता -

"मी माणूस "

शीर्षकाची अन्वर्थकता

कवितासंग्रहाचे नाव "नीहार" आहे. "नीहार" म्हणजे धुके, दव, बर्फ. मुखपृष्ठावर एक-दोन गवताची पाती असून त्यावर दवाचे थेंब पडल्याचे दाखविले आहेत. त्याबरोबर धुक्याचे लोट दाखविलेले आहेत. या कवितासंग्रहातील कविता ह्या दवाप्रमाणे शुद्ध भावकविता आहेत. "नीहार" या शब्दाचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या या कविता आहेत. भावतरल, अद्भूत, गूढरम्य अशा वातावरणात रसिक प्रवेश करतो.

या कवितासंग्रहातील कवितांची शीर्षके विचारात घेतली तर असे जाणवते की, काही कवितांची शीर्षके ही पहिल्या ओळीतच येतात तर

काही कवितांची शीर्षके शेवटच्या ओळीत येतात.

पहिल्या ओळीत शीर्षक येणाऱ्या कविता -

: असू दे ग शेजीबाई :

"असू दे ग शेजीबाई माझा राजस सावळा
गोकुळीचा ब्रम्हानंद कृष्ण नव्हे का सावळा"

[पृ.२]

इथे पहिल्याच ओळीमध्ये कवितेचे शीर्षक आले आहे.

: :माझा सुधीर :

"माझा सुधीर सावळा हिणविते जन वाचा
"आणि दाखविते मज कोणी दिमाख कुणाचा"

[पृ.१९]

या कवितेत पहिल्याच ओळीत शीर्षक आहे. याच प्रकारच्या पुढील कविता आहेत. "रहदारीच्या पथापलिकडे", "विडा", "माझ्या पाठच्या बहिणी", "ये अवचित नवजीवन", "सखे तुझे पत्र आले", "मध्यरात्री", संध्याकाळ उलटली", "रे तू फसवा", "स्वप्नात आज मी वावरते", "मी वेडी", "नकळत", "माहेरास जावयाचे", "घटी घटी", "आम्ही कुलीनांच्या कन्या", "होते मी जगत मुदे", "भाद्रपदातील विनोदी पाऊस", "अशीच यावी रात्र चांदणी" "एकटे असाया", "अवखळ ये परीसमान", "अंकुराच्या संपुटी" झपाटलेले झाड", "आज बाहेरच जावे वाटेना", "मी घुसळण घुसळीत असता", " ही हिरवी हिरवी राई", "या रस्त्यातच", "तू नव्हेस तो", "येसी वसंत पाऊली", "अचानक उजळीत", "येतो पाऊस", "अखेर येते", "करीत लवलव" "करवंदाची ओंजळ", "त्या तसल्या संध्याकाळी", "प्रेम नको वाटाया", "हे शापित वंचित मन माझे" "अभिलाषेच्या पोटी".

पुढील कवितांची शीर्षके ही कवितेच्या दुस-या ओळीत येतात.

अनुभावसी का कधी -

"सांग कधी निजस्मृतीत मज तू पाहसी का मोहना ?
अनुभावसी का कधी माझिया प्रीतीच्या भावना ?

इथे कवितेचे शीर्षक दुस-या ओळीत आले आहे.

उगवला शुक्र -

"अजून पाहते कोणाची वाट ?
उगवला शुक्र झाली पहाट"

[पृ.३३]

याठिकाणी दुसऱ्या ओळीत कवितेचे शीर्षक आले आहे.

शेवटच्या ओळीत येणारी शीर्षके कविता वाचून संपल्यावर रसिकांचे लक्ष पुनश्च शीर्षकाकडे वेधून घेतात.

मी माणूस -

"संसाराची खोल रास
खुशाल डोल खुशाल नाच
गर्जत एकच, एकच घोषा -
मी माणूस! - मी माणूस!."

[पृ.३७]

नाही जायचे असाने -

"नको तेथे बसूनीयां
पाहू रोखल्या दृष्टीने!
नाही जायचे असाने! "

[पृ.३]

वरील कवितांमध्ये त्यांचे शीर्षक हे कवितेच्या शेवटच्या ओळीत आले आहे व ते कवितेचा आशय स्पष्ट करते. पुढील कवितांची शीर्षकेही कवितेच्या शेवटी आली आहेत,

"अनुभावसी का कधी", "नको विचारू अर्थ" "याच काही क्षणांसाठी", अजून काही आहे बाकी"."लक्ष्मणरेषा", "स्वप्नमयी", "वैरी" "कसे समजावू तुला", माझे मन", "वाट", "आषाढ".

पुढील कवितांची शीर्षके ही कवितेचा आशय स्पष्ट करणारी आहेत.

उदा. असू दे ग शेजीबाई -

हे शीर्षक वाचल्यानंतर समजते की ही कविता शेजारणी-संबंधात आहे. तसेच यातून शेजारणीस विनवणी केली आहे.

माझा सुधीर -

ही कविता सुधीर या मुलासंबंधीत आहे. हे शीर्षक वाचल्या-वर कळते.तसेच आईला मुलाचे कौतुक असते.त्यामुळे सुधीरचे कौतुक यात असणार हे लक्षात येते.

या काव्यसंग्रहातील काही कवितांच्या शीर्षकाचा थोडा अधिक विचार करण्याचे योजिले आहे. "असू दे ग शेजीबाई" [पृ.२] हे शीर्षक शेजारणीशी प्रेमळपणाने संवाद साधणा-या आईचे चित्र अगदी सहजपणे रसिकांसमोर उभे करते. शेजारणीच्या तोंडून बोलण्याचे देखील आपल्या गोड बोलण्याने भावबंध जोडण्याच्या दृष्टीने ती समांतर करून घेते. तर "मध्यरात्री" [पृ.१४] या कवितेत मध्यरात्री सृष्टी एका प्रकारच्या समाधीत कशी

व्यथा बुडालेली आहे हे कवयित्रीने अगदी सूक्ष्मपणे व्यक्त केलेले आहे.

"आम्ही कुलीनाच्या कन्या" (पृ.२४) हे शीर्षक कुलीन मुलीच्या गुणांचे, तिच्या करारीपणाचे, संयमाचे, समर्पण वृत्तीचे, दुःख सोसणाऱ्या शक्तीचे दर्शन घडविते तर "माझ्या पाठच्या बहिणी" (पृ.१०) हे शीर्षक बहिणीचा – बालपणीचा सहवास जसा वर्तमानात उभा करते तसेच वर्तमानातील आपल्या माता–गृहिणी या जबाबदारीच्या भूमिकांचेही स्मरण करून देते. पाठची बहीण ही सुखादुःखाचा जन्माउस प्रत्ययाला आणून देते हेच खरे. अशाच प्रकारची "सखे तुझे पत्र आले" (पृ.१३) "माहेरास जावयाचे" (पृ.२२) आई झाल्यावर (पृ.७७) "पुनःप्रत्यय" (पृ.२७) "आषाढ" (पृ.५६) इत्यादी कविता आहेत.

## अलंकार वैभव – ~~[illegible]~~ –

शीर्षकानंतर अलंकाराच्या कलात्मक उपयोजनाचा विचार करावयाचा.

काव्याचे सौंदर्य खुलवण्यासाठी अलंकाराचा उपयोग केला जातो. कवयित्रीने शब्दालंकार व अर्थालंकार योजिले आहेत,

या काव्यसंग्रहामध्ये कवयित्रीने मोठ्या प्रमाणावर यमक साधलेला आहे. यमक साधताना बहुतेक ठिकाणी एकाक्षरी अन्त्ययमक आहे. पण येथे उदाहरणादाखल काही निवडक उदाहरणांचा विचार केलेला आहे.

"अखेर येते तुझ्या मंदिरी
            जखमी माझे हृदय घेऊनी
निज रक्ताने न्हात गाते
            आळविते तुज दिवस–यामिनी"

("अखेर येते" पृ.[illegible])

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या काव्यात दोऊनी-यामिनी या शब्दात अनुप्रयमक साधला आहे. हे यमक जखमी हृदयाची तीव्रता वरील दोन्ही शब्दांमधून अधिक परिणामकारकपणे व्यक्त करते.

"असेच अश्रू, असेच फडफड, फडफड
असेच उठते हे काहूर;
उगिच कुसासत, सुगंध उधळित
लपेटत राही मनी कापूर";
["नको विचारू अर्थ" पृ. ५]

प्रणयातील विरहाचा भाव काहूर व कापराप्रमाणे मन जळणे या दोन्ही भावना एकत्र आल्याने हीउत्कटता अधिक गहिरी झाली आहे.

"चार डोळ्यांच्या मीलनी
राया! रंगला रे विडा!
आज आठवणीने त्या
मनी दर्वळे केवडा!"

["विडा" पृ.९]

विडा-केवडा या शब्दांतुन प्रणयातील शृंगारभाव सुबकतेने व्यक्त झालेला आहे. सारा भूतकाळ वर्तमानात अवतीर्ण होऊन कवितेतील शृंगारभाव साक्षात करतो आहे असे वाटते.

"परी कधी हे पुरुषा! अदया!
रामस्वरूपी तुला बघावे
भूमिगता सीताच होऊनी
एकाकीपणी तुज रडवावे"

["कधी-कधी" पृ.२३]

"बघावे-रडवावे" यातून राम सीतेच्या जीवनातील दु:ख व नायक-नायिकेच्या जीवनातील दु:ख समोरासमोर उभे राहते व नायक नायिकेच्या दु:खाची व्याप्ती वाढते.

"अचानक उजळीत कुंद दिशांना नीरव
घनश्याम आषाढाचा येई मत्त पदरव"

["अचानक उजळीत" पृ. ४६]

"नीरव-पदरव" या शब्दांतून विरोधाभास परिणामकारकपणे व्यक्त झाला आहे. शांत अशा कुंद दिशा आणि घनश्याम आषाढमेघांचे झालेले आगमन यातून विरोधाभास स्पष्ट होतो.

उपमा :-

"ये अवचित नवजीवन"
पुष्पपरिमला समान
मंदगंधित देहातुन
गीत गात श्वासातून स्पर्शित ये भासातून"

[पृ. १२]

इथे देह हा पुष्पपरिमलासारखा हलका व मंद सुगंध देणारा झाला आहे. यामधून निसर्गओढ व्यक्त झाली आहे.

'अवखळ ये परीसमान'

"घेऊन ओढणी जरतारी सुकुमार
मज खुणाविते "ये बनुनी अवखळ पोर
अन मलाहि वाटे मुक्त सोडूनी केस
लेऊनी परीसम हलका निस्सार वेष."

[पृ. ३१]

याठिकाणी परीसारखा निळा वेष करुन अवखळ पोर बनावे असे कवयित्रीस वाटते. परीसम ही उपमा कवयित्रीने दिली आहे. या ओळींमधून कवयित्रीची स्वप्नमयता साक्षात होते.

येतो पाऊस -

"ओठ जयांचे प्राजक्ताच्या देठासम
अन् मृदगंधासम वास जयांना
जहर शोषिती मम हृदयातिल
तन्मयतेने!
-आणि पिणाऱ्या बाळासमही
ज्यास लपविते पदराखाली

[पृ.४८]

देठासम, मृदगंधासम, बाळासम या शब्दांची उपमा देऊन कवयित्रीने वात्सल्यभाव अधिक व्यापक स्वरुपात व्यक्त केला आहे.

त्या तसल्या संध्याकाळी -

"मीलनोत्सुक उभी सदाची
दक्षिणाच्या त्या कुमारीपरी"

[पृ.५४]

कन्याकुमारीचा संदर्भ.

याठिकाणी कुमारीपरी हा शब्द प्रेमभाव व्यक्त करतो. मीलनोत्सुक कुमारी जशी उभी रहाते त्या स्वरुपाची आतुरता नायिकेच्या मनात निर्माण होते.

उत्प्रेक्षा -

नकळत

"मावळते हासू ओघळती आसू

"जणू खाष्ट सासू बोले कोणी"

[पृ.२१]

येथे उत्प्रेक्षा हा अलंकार जणू या शब्दाने सूचित होतो. सासू हे उपमान आहे पण उपमेय कोणते ? नायिका सून आहे का ? हे नीट स्पष्ट होत नाही. त्यामुळे हा दोष जाणवतो.

अनुप्रास -

"शुक्रतारा"

"पारिजात निशिगंधा-गंधमय दुशाल अंगावर
तरुशाखांच्या ढोऊनि पंखा मलयातिल तत्पर"

[पृ.१८]

गंधा - गंधमय - अंगावर या शब्दातून ग, ध या वर्णांची द्विरुक्ती झालेली आहे व दुशाल अंगावर या शब्दातून जब सूचित करीत करीत गंधमयताही दरवळते आहे असे जाणवते, तर दुस-या ओळीतील शाखा व पंखा यातील खा वर्णांची पुनरावृत्ती मलयानिलाची अगत्यशीलता सूचित करतो.

प्रश्नालंकार :-

अनुभाविसी का कधी -

"सांग कधी निजस्मृतीत मज तू पाहसि का मोहना ?
अनुभाविसी का कधी माझिया प्रीतीच्या यातना ?

[पृ.४]

इथे प्रश्न विचारुन आपल्या मनातील विरहभाव कवयित्रीने स्पष्ट केला आहे;

संध्याकाळ उलटली -

"यावा यावा वाटे रोज तोच आला का प्रवासी?
परी येईल तो कसा अशा कातरवेळी?"

[पृ.१५]

कवितेच्या नायिकेचा इच्छित असणारा प्रियकर आला का असा प्रश्न तिच्या मनात पडतो व पुन्हा अशा कातरवेळी तो कसा येईल असाही प्रश्न येतो. यातून प्रेमभाव व्यक्त होतो. तसेच नायिकेच्या मनाची आतुरताही स्पष्ट होते.

मी वेडी -

टाकू का या तोडून ?
राहिन का त्यावाचून
क्षणभर तरी मी जिवंत ?

[पृ.२०]

या ठिकाणी कवयित्रीच्या मनात निर्माण झालेली आशंका प्रश्नामधून व्यक्त होते. आयुष्यातील भावनांच्या निरगाठी सुरगाठी तोडून टाकू का व टाकल्या तर मी जगेन का असा प्रश्न तिला पडतो.

या अलंकार वैभवानंतर विशेषणांच्या कलात्मक उपयोगा-विषयीचे विवेचन प्रस्तुत आहे.

## विशेषणांचा कलात्मक उपयोग

विशेषणाच्या वापरामुळे नामाच्या गुणाची स्पष्टता अधिक होते. वाक्यात विशेषणाचा वापर नामाच्या पूर्वी केलेला असतो.

"नीहार" या काव्यसंग्रहात पुढील विशेषणे आली आहेत.

वत्सल दृष्टी - इथे वत्सल हे विशेषण वापरले आहे. हे विशेषण "आई झाल्यावर" या कवितेतील आहे. वत्सलपणा हा आईच्या दृष्टीचा गुण त्यातून स्पष्ट होतो.

प्राजक्ताचे फूल - प्राजक्ताचे हे विशेषण "असू दे ग शेजीबाई" या कवितेतील आहे. प्राजक्ताची फुले कोमल असतात त्याचप्रमाणे बाळही प्राजक्ताच्या फुलासारखे कोमल आहे. हे समजावून देण्यासाठी प्राजक्ताचे फूल हे विशेषण योजिले आहे.

शशिकिरणांची मखरदाणी - शशिकिरणांची हे विशेषण काव्यात्मकता अधिक खुलविते. हे विशेषण "शुक्रतारा" या कवितेमध्ये योजिले आहे. त्यातुन कवयित्रीचे कल्पनाचातुर्य दिसून येते.

पाखोरीज खट्याळ वारा [भाद्रपदातील विनोदी पाऊस] लखलखती क्षण [होते मी जगत मुदे] "मखमली परकर [अवखळ ये पोटीसमान], स्मृतींचे पोळे [एकटे बसाया],मखमली पावलाखाली, रेशमी अंधार, केशरी ज्योत [उगवला शुक्र], निळसर मृदु पंखा, गोकर्णीचे फूल, फिक्ट केशरी आकाश [करीत लवलव],निळे चांदणे [रहदारीच्या पथापलीकडे] इत्यादी विशेषणांचा कलात्मक उपयोग केलेला आहे. त्यामुळे कवितेला अर्थसौंदर्य प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर एखादया वस्तूचा अथवा व्यक्तीचा नेमकेपणा व वैशिष्टय अतिशय ठाशीवपणे व्यक्त झाले आहे.

<u>संस्कृत प्रचुर शब्दांचा कलात्मक वापर</u> - हे एक या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. या कवितासंग्रहात काही संस्कृत प्रचुर शब्दांचा वापर कवयित्रीने

केला आहे. कवयित्री बालपणी पुराणकथा ऐकत असे. त्याचा परिणाम म्हणून संस्कृतप्रचुर शब्द आले असावेत.
काही शब्द - सौधावर, चित्त, सुवर्णक्षिण, मृदगंधा, गवाक्ष, म्लान इत्यादी या शब्दांमुळे कवितेतील वातावरण अधिक प्रसन्न होण्यास मदत झालेली आहे.

"नीहार" या काव्यसंग्रहाची वैशिष्टये पाहिल्यानंतर याविषयीचा प्र. वा. भा. पाठकांचा अभिप्राय नोंदवणे गरजेचे आहे.

ते म्हणतात,

"चाफेकळ्या पानाआड! मुली मांडू ना आरास मुग्धपणे लावू वेड" अशा शब्दात त्या (पद्मा गोळे) आपली कुलीनता प्रकट करतात. स्त्रीचे प्रभावी सामर्थ्य "नव्या युगाची युगंधरा" यामध्ये प्रकट केले आहे. "अशी मानवता मी मजला पाहिन दास्यी ठेवल कोण" असा त्यांचा सवाल आहे. स्त्री ही पुरुषाची अर्धांगी असली, तरी अदय रामाला भूमीगत सीता बनून ती त्याला एकाकीपणे रडवू शकते. हा यथार्थ अभिमान तिला आहे. [कधी कधी] अभिलाषा, मी माणूस इत्यादी कवितांमधून स्त्रीकडे पाहणा-या पुरुषी विलासी वृत्तीचा निषेध सूचीत केला आहे. पतीपत्नीतील संयमित भावनांची चित्रेही त्यांनी काढली आहेत. "माहेरास जावयाचे", "याच काही क्षणासाठी" इत्यादी कवितांमधून ती रेखाटली आहेत. त्याच्या येण्याची आतुरतेने वाट पाहणा-या आणि तो येऊन गेल्यावर त्याच्या दर्शनाने बधीर झालेल्या प्रणयिनीचे चित्र मोहक वाटते." २

तसेच या कवितेचा अर्थ उकलून दाखवताना प्रा. अ.ना.देशपांडे म्हणतात,

"या कवितांतून आजच्या स्त्रीच्या कौटुंबिक जीवनातील विविध छटांचे हृदय दर्शन घडविले आहे. आजच्या स्त्रीच्या कौटुंबिक जीवनातील हे चित्र हा पद्माबाईंच्या कविता संग्रहाचा एक वैशिष्टयपूर्ण भाग आहे, या संग्रहातील स्त्रीच्या भावना सोज्वळ वा मादक परिसरापुरत्या मर्यादित नाहीत. नव्या युगातील ध्येयवादी स्त्रीच्या तेजस्वी आशा-आकांक्षाही पद्माबाईंनी व्यक्त केल्या आहेत."[४]

वरील सर्व विवेचनावरुन "नीहार" या काव्यसंग्रहासंबंधी पुढील काही निरीक्षणे नोंदवता येतात.

१] या काव्यसंग्रहाची प्रेमभावाची विविधता, वात्सल्य, भगिनी प्रेम, सखीप्रेम, काव्यनिर्मितीची कैफियत, आत्मविष्काराची ओढ, निसर्गाची ओढ ही आशयसूत्रे आहेत.

२] प्रेमभावाची विविधता , विरहभाव, प्रियकराचे कौतुक, सांस्कृतिक संकेत, मूक प्रेम, दैवी प्रेम, सुखादु:ख मिश्रीत प्रेम, परंपरेची ओढ, उत्कट प्रेमभाव, विफल प्रीती, प्रेमाचा प्रभाव, परस्परांना विश्वस्त करण्याची वृत्ती, स्वप्नमयता, माहेरची ओढ, निसर्गाशी संवाद साधणारे प्रेम, भारतीय प्रीती, संयमित प्रेम, दु:ख साजरे करण्याची वृत्ती, तृप्त प्रेम, विरहभावाचे चित्रण, फसल्याची जाणीव, अस्पष्ट प्रिती द्वंद्वात्मक भाव, दु:खी प्रेम, आठवणींचा उत्सव, प्रियकराची ओढ, चिरंतन प्रेम, राधाकृष्ण प्रेम या अंगाने व्यक्त झाली आहे.

३) वात्सल्य हे आशयसूत्र मातृप्रेमाची जाणीव, चिमणी, मुलाचे कौतुक या घटकांनी स्पष्ट झाले आहे.

४) भगिनीप्रेम हे आशयसूत्र भगिनीभेट या घटकाने व्यक्त झाले आहे.

५) सखीप्रेम हे आशयसूत्र पत्रभेट या घटकाने स्पष्ट झाले आहे.

६) काव्यनिर्मितीची कैफियत हे आशयसूत्र कविता व कवी संबंध या अंगाने व्यक्त झालेले आहे.

७) आत्माविष्काराची ओढ हे आशयसूत्र पूर्णत्वाची ओढ, निर्मितीचे भान, कुलीनांच्या कन्यांचे कौतुक, एकांतप्रियता, प्रभातसौंदर्य, स्त्री-पुरुष समानता, बदलाचा स्वीकार समृद्ध मन, घराची ओढ, मनाची अस्वस्थता या घटकांनी व्यक्त झाली आहे.

८) निसर्गाची ओढ हे आशयसूत्र अंधारातील सृष्टीदर्शन, पाऊस व मन संबंध, मिस्किल वातावरण निसर्गाचे वैभव व कल्पना वैभव या घटकांनी स्पष्ट झालेले आहे.

९) अभिव्यक्तीच्या दृष्टीने छंदोबद्ध तशीच मुक्तछंदात्मक रचना, ओळींच्या संख्यानुसारी गट, शीर्षकांची अन्वर्थकता, अलंकार वैभव, विशेषणांचा व संस्कृत प्रचुर शब्दांचा कलात्मक उपयोग ही वैशिष्ट्ये जाणवतात.

१०) मान्यवर कवींचे अनुकरण व अलंकाराच्या अर्थपूर्ण उपयोजनाचा अभाव हे दोन दोष अभिव्यक्तीदृष्टया जाणवतात.

प्रकरण तिसरे, संदर्भ

१] जोशी मीना, "निरीक्षा" पुणे, १९७८

[पृ. ९५ ]

२] जोशी प्र.न., "मराठी वाङ्‌मयाचा विवेचक इतिहास," पुणे, १९७९,

पृ. २२१.

३] पाठक वा.भा., "आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह", पुणे, १९९४.

पृ. १८३-८४.

४] देशपांडे अ.ना., "आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास.

भाग दुसरा १९२० ते १९५०'. पुणे., १९५८.

पृ. ५०७.